0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांचेकडून दि.१५/०७/११ रोजी प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल /६-अ/प्र.क्र.५१/२०११/जा.५७७, दिनांक २२/०७/२०११, ०३/०८/२०११ व २४/०८/२०११.

३) पोलीस निरीक्षक (गुन्हे), सायन पोलीस ठाणे यांचे दि.२३/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन.

४) ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे मालक, चालक व क्लिनर यांनी ॲड. किशोर लक्ष्मण सिराम यांचे वकालतनाम्यासह दिनांक ३०/०८/२०११ रोजी सादर केलेले लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५१/२०११/जा. ८७८

नियंत्रक शिधावाटप व संचालक

नागरी पुरवठा यांचे कार्यालय,

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,

१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,

मुंबई - ४०० ०२०.

दिनांक :२२/०९/२०११.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

धारावी मेन रोड परिसरात शासन नियंत्रित दराच्या निळ्या केरोसिनची बेकायदेशिररित्या खरेदी - विक्री करुन सदरचे केरोसिन ट्रक अथवा तत्सम वाहनांच्या इंधन टाकीमध्ये इंधन म्हणून भरले जात असल्याची माहिती दि. १२/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळाल्यावरुन या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह घटनास्थळी पोहचले व सदर विभागात ठेऊ लागले. ठिक १७:३० वाजता सदर विभागातील मुरगन चाळीजवळ एक ट्रक उभा असून त्याच्या इंधन टाकीजवळ ३ इसम उभे असल्याचे दिसले. त्यातील १ इसम इंधन टाकीमध्ये कॅनमधील द्रवपदार्थ ओतत असल्याचे आढळून आले. त्याबरोबर वरील पथकाने संशयास्पद ट्रकच्या दिशेने सरकण्यास सुरुवात केली. त्याचवेळी ट्रकजवळ उभ्या असलेल्या इसमांना पथकाच्या हालचालींचा संशय आल्याने त्यातील एक इसम दोन प्लास्टिक कॅन घेऊन सायकलवरुन वेगाने पळून गेला. पथकातील अधिकारी वर्ग

ट्रकजवळ पोहचेपर्यंत उर्वरित २ इसम ट्रकमध्ये वेगाने चढून ट्रक सुरु केल्याने, अधिकारी वर्गाने शासकीय वाहनातून सदर ट्रकचा पाठलाग केला.

सदर ट्रक १८:३० वाजता लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन येथे अडवून अधिकारी वर्गाने सदर ट्रक थांबविला. तद्नंतर ट्रकमधील इसमांना खाली उतरण्यास सांगून त्यांना नाव, गांव विचारले असता या इसमांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा येत नसून ते दक्षिणात्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. त्यांना खाणाखुणा करुन त्यांची भाषा ओळखण्याऱ्या इसमास बोलावून घेण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार काही काळाने तेथे एक इसम उपस्थित झाला. त्याने आपले नाव मरीयप्पा पिल्लई, व्यवसाय ट्रान्सपोर्टर, लक्ष्मी स्टार रोडलाईन्स, १/३ चटई चाळ, कॉटनग्रीन, मुंबई - ३३, भ्रमणध्वनी क्र. ९८६७५८५९९२ असे सांगितले. तद्नंतर मिळून आलेल्या ट्रकमधील २ इसमांना त्याच्या मदतीने नाव गाव विचारुन अधिक विचारणा केली असता, सदर इसमांनी त्यांची नावे रथिश किट्टू व बाबु मणी असे सांगून ते केरळ येथे राहणारे असल्याचे व ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे अनुक्रमे चालक व क्लिनर असल्याचे सांगितले. त्यानुसार अडविलेल्या ट्रकचा क्रमांक तपासून पाहिला असता तो सारखा आढळून आला. त्यांनी पुढे सांगितले की, सदर ट्रक कोइमत्तूर, तामिळनाडू येथून वेस्ट प्लास्टिक पावडर हा जिन्नस घेऊन निघाला व दिनांक १२/०७/२०११ रोजी सकाळी माहिम फाटक येथे पप्पू भाईच्या कंपनीत सदर जिन्नस उतरविण्यात आला. त्याचवेळी सायकलवरुन आलेल्या इसमाने विचारणा केल्यानुसार त्याच्याकडून रुपये ३४/- प्रति लिटर या दराने शासन नियंत्रित निळ्या रंगाचे केरोसिन एकूण रुपये १३६०/- देऊन ४० लिटर खरेदी केले व हे केरोसिन ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ च्या इंधन टाकीमध्ये भरुन टाकीचे झाकण लावत असताना केरोसिन विक्री करणारा इसम त्यांना सावध करुन सायकलवरुन रिकामे कॅन घेऊन पळून गेला. त्याचवेळी त्यांनी सावध होऊन वेगाने ट्रकमध्ये चढून ट्रक सुरु केला. ट्रक काही अंतर चालून सायन हॉस्पिटल जवळ आला असता अधिकाऱ्यांनी त्यांचा ट्रक अडविला. ताब्यात घेण्यात आलेल्या दोन इसमांनी कथन केल्यानुसार त्यांचा जबाब नोंदून घेण्यात आला व त्यांनी बोलविलेल्या दुभाषा मार्फत तो त्यांना समजावून सांगून त्याच्या सत्यतेची खातरजमा करण्यात आली. तद्नंतर त्यांना ट्रकच्या इंधन टाकीचे झाकण उघडण्यास सांगून प्लास्टिक नळीद्वारे इंधन टाकीतील द्रवपदार्थाचा नमूना बाहेर काढला. सदर नमून्याचा रंग व वास यावरुन इंधन टाकीमध्ये इंधन म्हणून वापरण्यात येत असलेला द्रवपदार्थ शासन नियंत्रित दराचे निळ्या रंगाचे केरोसिन असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगनमत करुन शासनाने अनुदानित दराने फक्त शिधावाटप दुकानातून शिधापत्रिकाद्वारे सर्वसामान्य जनतेला दिवाबत्ती व स्वंयपाकाच्या कामाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या

शासन नियंत्रित केरोसिनची गैरमार्गाने व बेकायदेशीररित्या खरेदी विक्री करुन खाजगी वाहनात इंधन म्हणून वापर केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ [२] दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ [३] दि बॉम्बे रेशनिग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज (रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर १९८६ चे कलम ६ व ८ [४] दि मोटार स्पिरीट ॲण्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रीव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५ चे कलम ३ (३) (ए), ४, ५, ६ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द सायन पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.ख.क्र. ०९/२०११ दि.१२/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | अशोक लेलॅन्ड कंपनीचा ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ | १ नग | ७,००,०००/- |
| २ | ट्रकच्या इंधन टाकीमध्ये मिळून आलेले शासन नियंत्रित निळ्या रंगाचे केरोसिन | १२५ लिटर | ६,५६८/- |
| | | एकूण | ७,०६,५६८/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उप नियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र.१ अन्वये केली असून, त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०२/०८/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि.१६/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची अंतिम संधी म्हणून पुढील सुनावणी दि. ३०/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे मालक के. पी. मणी, चालक रतिश किट्टू व क्लिनर बाबू मणी यांनी ॲड. किशोर लक्ष्मण सिराम यांचे वकालतनाम्यासह दिनांक ३०/०८/२०११ रोजी लेखी निवेदन सादर केले. ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे चालक रतिश किट्टू व क्लिनर बाबू मणी हे उपस्थित राहिले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहिले नाहीत. तथापी, त्यांनी त्यांचे अभिवेदन दिनांक २३/०८/२०११ च्या पत्रान्वये टपालामार्फत सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात येत आहे.

<u>युक्तिवाद</u> :-

पोलीस निरीक्षक (गुन्हे), सायन पोलिस ठाणे यांनी दि.२३/०८/२०११ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या अभिवेदनात, सायकलवरुन केरोसिनची विक्री करणारा अनोखळी आरोपी हा मिळून आला नसल्याने त्यास नोटीसची बजावणी करता आलेली नाही. तसेच नमूद ट्रकचा मालक हा तामिळनाडू राज्यात राहत असल्याने त्यास नोटीसची बजावणी करता आलेली नाही. मोटार ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चा मालक, चालक रतिश किट्टू व क्लिनर बाबू मणी हे तामीळनाडू राज्यात राहाणारे असून सदर गुन्ह्याचा तपास अद्याप चालू आहे. याकारणास्तव गुन्ह्यातील मोटार ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ हा संबंधित मालकाच्या ताब्यात देण्यास पोलिसांची सक्त हरकत आहे. गुन्ह्याच्या तपासात ट्रकमध्ये भरलेले १२५ लिटर शासन नियंत्रित केरोसिन किंमत ६,५६८/- हे शासकीय नियमाप्रमाणे वितरीत करण्यास पोलिसांची हरकत नाही, असे नमूद केले आहे.

ॲड. किशोर लक्ष्मण सिराम यांनी त्यांचे अशील ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे मालक के. पी. मणी यांचे वतीने युक्तिवाद केला की, त्याचे अशिल के. पी. मणी हे जप्त केलेला ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे अधिकृत मालक असून रितेश किट्टु हे सदर ट्रकचे चालक व बाबू मणी हे सदर ट्रकचे क्लिनर आहेत. त्याचे अशिलास तामील व केरला सोडून अन्य कुठल्याही भाषा येत नाहीत. सदर ट्रक ते तामीळनाडूमधून वेस्ट प्लॉस्टिक पावडरने भरुन माहिम फाटक, मुंबई येथे पप्पू भाई यास देण्यास निघाले होते. मुंबई पोलिसांनी सदर ट्रक निळ्या केरोसिनसह जप्त केला याचे त्याच्या अशिलास आश्चर्य वाटत आहे. सदर ट्रक भारतात कोठेही माल वाहतूक करण्यासाठी आहे, तसे त्याच्या अशिलाकडे २०१५ पर्यंतचे नॅशनल परमिट आहे. त्याचे अशिलाने चालक व क्लिनर यास कधीही डिझेलच्या ऐवजी केरोसिन वापरण्यास सांगितले नाही. कारण हा गुन्हा आहे. तसेच त्यामुळे ट्रकचे इंजिनही खराब होऊ शकते. त्याचे अशिलावर किंवा चालक, क्लिनरवर यापूर्वी असा कोणताही गुन्हा नोंद नाही. चालक व क्लिनर मुंबई येथे घेऊन जात असलेल्या ट्रकमध्ये त्याचा अशिल व्यक्तिश: हजर नव्हता. त्याच्या अशिलाने

चालक व क्लिनर यास विक्री करण्यास केरोसिन खरेदी करणे किंवा इतर गैरवर्तणूकीचे कृत्य करण्यास कोणतीही अनुमती दिली नव्हती. सदर गुन्ह्यात त्याचे अशिलाचा काहीही संबंध नाही. सदर ट्रकवरच त्याचे अशिलाचा कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. सदर ट्रक त्याचे अशिलाने एच.डी.एफ.सी. बँकेकडून कर्जाने घेतला असून त्याअनुषंगाने तो महिन्याचे हप्ते भरत आहे. सदर गुन्ह्यात जप्त केलेले केरोसीन जप्त करुन त्यांचा अशिलाचा ट्रक त्यांना योग्य त्या अटी व शर्तीवर परत मिळावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले आहे.

ॲड: किशोर लक्ष्मण सिराम हे त्यांचे अशील ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे चालक रतिश किट्टू व विलनर बाबू मनी यांचेसह उपस्थित राहून त्यांचेवतीने युक्तिवाद केला की, सदर ट्रकवर त्यांचे अशिल रतिश किट्टू हा चालक तसेच बाबू मनी हा क्लिनर म्हणून काम करीत आहे. त्याचे अशिलास तामील व केरला सोडून अन्य कुठल्याही भाषा येत नाहीत. सदर ट्रक ते तामीळनाडूमधून वेस्ट प्लॅस्टिक पावडरने भरुन माहिम फाटक, मुंबई येथे पप्पू भाई यास देण्यास निघाले होते. सदरचा माल पप्पू भाई यांच्या गोडावूनमध्ये खाली करुन ट्रक सायन हॉस्पीटल जवळ उभा केला. ट्रकच्या इंधन टाकीत डिझेल इतके कमी होते की तो पेट्रोलपंपापर्यंत जावू शकत नव्हता. तो तेथे नवीन असल्यामुळे डिझेल मिळण्यासाठी स्थानिक नागरिकांशी संपर्क साधला. त्यानुसार एक अनोळखी व्यक्ती तेथे आला व त्याने हिंन्दीमध्ये विचारले. त्यानंतर त्या अनोळख्या व्यक्तिने सायकलवरुन दोन लहान कॅन आणले. त्याचे अशिलाने कॅनमध्ये डिझेल असल्याची खात्री केली. सदर कॅनमधील डिझेल ट्रकच्या इंधन टाकीमध्ये टाकले व नंतर तो अनोळखी इसम सायकलवरुन निघून गेला. थोड्यावेळाने अनोळखी इसम तेथे आले व त्यांनी चौकशी केली. परंतु त्यांच्या अशिलांना तेथील परिस्थिती समजली नाही. श्री. मारीअप्पा पिल्लई यांच्या मदतीने शिधावाटप अधिकाऱ्यांनी त्याच्या अशिलाला परिस्थिती समजावून सांगितली. त्याच्या मदतीने अधिकाऱ्यांनी त्याच्या अशिलाला डिझेल टँकचे झाकण उघडण्यास सांगितले व सदर टँकमधील नमूने घेतले. त्यानंतरच त्याच्या अशिलाला ते केरोसिन असल्याचे समजले. त्याच्या अशिलाला अनोळख्या व्यक्तीने एका कॅनमध्ये डिझेल दाखवून दुसऱ्या कॅनमध्ये केरोसिन देऊन फसवणूक केली आहे. डिझेल टँकमध्ये टाकलेले इंधन केरोसिन असल्याचे त्याच्या अशिलास माहित नव्हते. तसेच त्याच्या अशिलाच्या भाषेचा फायदा घेऊन अनोखळ्या व्यक्तीने त्याला केरोसिन दिले. ट्रकमध्ये असलेले केरोसिन त्याच्या अशिलाने वितरण किंवा विक्री किंवा इतर हेतूने घेतले नव्हते. केरोसिन टँकमध्ये ओतत असताना त्याच्या अशिलाने अनोळख्या इसमाकडे डिझेलच्या बिलाबाबत विचारणा केली असता, तो इसम तेथून पळून गेला. घटनेचे वेळी त्या ठिकाणी त्याचे अशिलाचे ट्रक मालक उपस्थित नव्हते आणि मालकाच्या त्यामध्ये काहीही संबंध नाही. तरी सदरचा जप्त ट्रक त्याचे अशिलाचे ट्रक मालक के. पी. मनी यांना परत करुन जप्त केरोसिनची विल्हेवाट लावावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले आहे.

0006

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी पुढील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी दि.१२/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या बातमीनुसार येथील भरारी पथकाने धारावी मेन रोड परिसरातील मुरगन चाळीजवळ दोन पंचासह पोहचले असता, ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ च्या इंधन टाकीजवळ ३ इसम उभे असल्याचे व एक इसम इंधन टाकीमध्ये कॅनमधील द्रवपदार्थ ओतत असल्याचे आढळून आले. ट्रकजवळ उभ्या असलेल्या इसमांना पथकाच्या हालचालींचा संशय आल्याने त्यातील एक इसम दोन प्लास्टिक कॅन घेऊन सायकलवरुन वेगांने पळून गेला. पथकातील अधिकारी वर्ग ट्रकजवळ पोहचेपर्यंत उर्वरित २ इसम ट्रकमध्ये वेगाने चढून ट्रक सुरु केल्याने, अधिकारी वर्गाने शासकीय वाहनातून सदर ट्रकचा पाठलाग करुन हा ट्रक लोकमान्य टिळक रुग्णालय, सायन येथे अडवून थांबविला. ट्रकमधील इसमाकडे विचारणा केली असता, या इसमांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा येत नसून ते दक्षिणात्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. त्यानुसार त्यांची भाषा माहिती असणाऱ्या मरीयप्पा पिल्लई, व्यवसाय ट्रान्सपोर्टर यांच्या मदतीने त्या इसमांकडे विचारणा केली असता, सदर इसमांनी त्यांची नावे रथिश किट्टू व बाबु मणी असे सांगून ते केरळ येथे राहणारे असल्याचे व ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे अनुक्रमे चालक व क्लिनर असल्याचे सांगितले. तसेच सदर ट्रक कोइम्तूर तामिळनाडू येथून वेस्ट प्लास्टिक पावडर हा जिन्नस घेऊन निघाला व दिनांक १२/०७/२०११ रोजी सकाळी माहिम फाटक येथे पप्पू भाईच्या कंपनीत सदर जिन्नस उतरविण्यात आला. त्याचवेळी सायकलवरुन आलेल्या इसमाने विचारणा केल्यानुसार त्याच्याकडून रुपये ३४/- प्रति लिटर या दराने शासन नियंत्रित निळ्या रंगाचे केरोसिन एकूण रुपये १३६०/- देऊन ४० लिटर खरेदी केले व हे केरोसिन ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ च्या इंधन टाकीमध्ये भरुन टाकीचे झाकण लावत असताना केरोसिन विक्री करणारा इसम त्यांना सावध करुन सायकलवरुन रिकामे कॅन घेऊन पळून गेला. यावरुन सदर ट्रक व त्यामधील १२५ लिटर केरोसिनचा साठा जप्त करण्यात आला.

पोलीसानी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्याचा तपास अद्याप चालू असून गुन्ह्यातील जप्त मोटार ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ हा संबंधित मालकाच्या ताब्यात देण्यास पोलिसांची सक्त हरकत असून, ट्रकमधील १२५ लिटर शासन नियंत्रित केरोसिन हे शासकीय नियमाप्रमाणे वितरीत करण्यास पोलिसांची हरकत नाही, असे नमूद केले आहे.

ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे चालक रतिश किट्टू व क्लिनर बाबू मनी यांचेवतीने ॲड. किशोर लक्ष्मण सिराम यांनी केलेल्या खुलाशात, त्याचे अशिल ट्रक चालक व क्लिनर यांना तामील व केरला सोडून अन्य कुठल्याही भाषा येत नाहीत. सदर ट्रकमध्ये तामीळनाडूमधून वेस्ट प्लॉस्टिक पावडर भरुन माहिम फाटक, मुंबई

येथील पप्पू भाई यांच्या गोडावूनमध्ये हा माल खाली करुन ट्रक सायन हॉस्पीटल जवळ उभा केला. परंतू ट्रकच्या इंधन टाकीत डिझेल कमी असल्याने ट्रक पेट्रोलपंपापर्यंत जावू शकत नव्हता. तसेच तो तेथे नवीन असल्यामुळे डिझेल मिळण्यासाठी स्थानिक नागरिकांशी संपर्क साधल्यानुसार एक अनोळखी व्यक्ती तेथे आला व हिन्दीमध्ये विचारुन त्या व्यक्तिने सायकलवरुन दोन लहान कॅन आणले. त्याचे अशिलाने कॅनमध्ये डिझेल असल्याची खात्री केली. सदर कॅनमधील डिझेल ट्रकच्या इंधन टाकीमध्ये टाकले व नंतर तो अनोळखी इसम सायकलवरुन निघून गेला. अधिकाऱ्यांनी त्यांचेकडे विचारणा केली परंतू त्यांना हिन्दी भाषा येत नसल्याने, मरियप्पा पिल्लई यांच्या मदतीने चौकशी केल्यानंतर त्याच्या अशिलाला ते केरोसिन असल्याचे समजले. त्याच्या अशिलाला अनोळख्या व्यक्तीने एका कॅनमध्ये डिझेल दाखवून दुसऱ्या कॅनमध्ये केरोसिन देऊन फसवणूक केली आहे. डिझेल टँकमध्ये टाकलेले इंधन केरोसिन असल्याचे त्याच्या अशिलास माहित नव्हते. तसेच त्याच्या अशिलाच्या भाषेचा फायदा घेऊन अनोखळ्या व्यक्तीने त्याला केरोसिन दिले. ट्रकमध्ये असलेले केरोसिन त्याच्या अशिलाने वितरण किंवा विक्री किंवा इतर हेतूने घेतले नव्हते. केरोसिन टँकमध्ये ओतत असताना त्याच्या अशिलाने अनोळख्या इसमाकडे डिझेलच्या बिलाबाबत विचारणा केली परंतू तो इसम तेथून पळून गेला. घटनेचे वेळी त्या ठिकाणी त्याचे अशिलाचे ट्रक मालक उपस्थित नव्हते आणि मालकाच्या त्यामध्ये काहीही संबंध नाही. तरी सदरचा जप्त ट्रक परत मिळावा असे नमूद केले आहे. जप्त ट्रकच्या इंधन टाकीमध्ये डिझेल कमी असल्याने त्यांना डिझेलची आवश्यकता होती. त्यामुळे त्यांनी अनोळख्या इसमाकडून दोन कॅनमध्ये डिझेल खरेदी केले. परंतू त्यांना तामील व केरला सोडून अन्य कुठल्याही भाषा येत नसल्याने अनोळख्या इसमाने डिझेल म्हणून केरोसिन देऊन त्यांची फसवणूक केली असल्याचे नमूद केले असले तरी, ट्रकच्या इंधन टाकीमध्ये डिझेल कमी असल्याने डिझेल घेण्याकरिता डिझेल पंपावर जाणे आवश्यक होते. तथापी, त्यांनी तसे केले नाही. तसेच घटनेच्या वेळी सदर ट्रक चालक व क्लिनर यांनी दिलेल्या जबाबात, ट्रकमध्ये इंधन म्हणून ३४/- रुपये प्रति लिटर दराने केरोसिन देत असल्याचे अनोखळी इसमाने सांगितल्याने व केरोसिनचा दर डिझेलपेक्षा कमी असल्याने ४० लिटर केरोसिनचे १३६०/- रुपये दिले. त्यानंतर सदरचे केरोसिन इंधन टाकीमध्ये भरले असल्याचा जबाब मरियप्पा पिल्लई यांचे मदतीने दिला आहे. यावरुन आरोपी यांनी शासन नियंत्रित निळे केरोसीनची गैरमार्गाने व बेकायदेशाररित्या खरेदी विक्री करुन जप्त ट्रकमध्ये इंधन म्हणून जाणीवपुर्वक वापर केल्याचे स्पष्ट होते. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ हा के. पी. मनी यांचे मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या कोयम्बतूर परिवहन विभागाचे परमीट नं. ३३०/टीएन३७/एनपी/२०१० वरुन दिसून येते. तसेच ट्रक मालक के. पी. मनी यांचे वतीने ॲड. किशोर लक्ष्मण सिराम यांनी केलेल्या खुलाशात, मुंबई

DIRECTOR OFFICE ... BAI

पोलिसांनी सदर ट्रक निळ्या केरोसिनसह जप्त केला याचे त्याच्या अशिलास आश्चर्य वाटत आहे. चालक व क्लिनर यास कधीही डिझेलच्या ऐवजी केरोसिन वापरण्यास, खरेदी विक्री करण्यास किंवा इतर गैरवर्तणूकीचे कृत्य करण्यास त्याचे अशिलाने सांगितले नाही. सदर ट्रकमध्ये ट्रक मालक व्यक्तिशः हजर नव्हते व सदर गुन्ह्यात मालकाचा काहीही संबंध नाही. सदर ट्रक त्याचे अशिलाने एच.डी.एफ.सी. बँकेकडून कर्जाने घेतंला असून या ट्रकवरच त्याचे अशिलाच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने सदरचा जप्त ट्रक परत मिळावा, असे नमूद केले आहे. टेम्पो मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, टेम्पो मालकाचे अपरोक्ष जरी त्यांचे वाहनाचा गैरवापर झाला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये सायन पोलिस स्टेशन, मुंबई येथे वि. स्था. ख. क्र. ०९/२०११ दि.१२/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## <u>आदेश :-</u>

१) जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा एकुण १२५ लिटर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ई-परिमंडळ कार्यालय, वडाळा यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम पोलीसांनी शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेल ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टेम्पो त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. अथवा ट्रक

मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे चालक, रथिश किट्टू
२) ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे क्लिनर, बाबु मणी
३) ट्रक क्र. टीएन-३३-एडब्ल्यु-२५७५ चे मालक
४) सायकलवरुन केरोसिन विक्री करणार इसम
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, सायन पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, सायन पोलीस स्टेशनं, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF ... OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.